**रे. मु. नं. ११५/२०२३**
**शिवदास वि. रमेश**
**निशाणी २५ खाली**

**<u>वादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ शिवदास काशिनाथ अडबोल याची पुढील सरतपासणी शपथेवर सुरू</u> — <u>वादीतर्फे विधिज्ञ श्री. एस. जी. कुळकर्णी यांच्यामार्फत</u> —**

प्रस्तुत प्रकरणी दाव्याच्या अनुषंगाने मी माझे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी २५ वर दाखल केले असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. वाद मिळकत मी दिलीप लेलेकर यांचेकडुन रू. २,००,०००/— विकत घेतली आहे. त्याबाबतचे मुळ खरेदी खत मी अभिलेखावर दाखल केले असुन त्यावर माझी 'खरेदी घेणार' म्हणुन सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर खरेदीखताला **निशाणी ३०** देण्यात येते. मी अभिलेखावर वाद मिळकतीची नमुना ८अ ची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्यास **निशाणी ३१** देण्यात येते. मी वाद मिळकतीचा कर भरल्याची अस्सल पावती अभिलेखावर दाखल केली आहे. सदर पावतीस **निशाणी ३२** देण्यात येते. वाद मिळकतीत माझे नांव दाखल झाले असुन मी अभिलेखावर त्याबाबतचा ७/१२ उता—याची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्यास **निशाणी ३३** देण्यात येते.

२. वाद मिळकतीसंदर्भात वाद झाला होता. मी सदर वादाबाबत दहिहांडा पोलीस ठाण्यात रिपोर्ट दिला होता. मी प्रतिवादी रमेश ज्ञानदेव मेहेंगे याला माझे वकिलांमार्फत दि. ०४/०१/२०२३ रोजीची नोटीस दिली होती. सदर नोटीसची स्थळप्रत मी अभिलेखावर दाखल केली असुन त्यावर माझे वकिलांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर नोटीसच्या स्थळप्रतीस **निशाणी ३४** देण्यात येते. नोटीस

निशाणी ३४ प्रतिवादी रमेश याला पाठवल्याबाबत पोस्टाची मुळ पावती दाखल मी अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **निशाणी ३५** देण्यात येते. मला प्रतिवादी रमेश याने त्याचे वकिलांमार्फत पाठवलेले दि. २९/०३/२०२३ रोजीच्या नोटीसचे उत्तर अभिलेखावर दाखल केले आहे. त्यास **निशाणी ३६** देण्यात येते. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — दोन्ही प्रतिवादींतर्फे ॲड. डि.एम. कुटे यांच्या तोंडी विनंतीवरून पुढील तारखेपावेतो तहकुब.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. ०६.०३.२०२६ (ए.ए. माळी)
अकोट २रे सह दिवाणी न्यायाधीश,
अकोट, जि. अकोला.